REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख १० डिसेंबर १९४७ | अंक ४८


दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँ
क
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें ०० 
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०४३
जमा झालेलें भांडवल रु. ७,०८,१९५
खेळतें भांडवल रु. ६५,००,०००

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १.
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. "

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

दि ट्रिनिटी मेटल वर्क्स लि., मुंबई

पत्र्याचे लहान—मोठे डबे करणारी कंपनी

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ३,७३,८००
जमा झालेलें भांडवल रु. ३,६७,८००

★ ह्या कारखान्यांत रसायनें, खाद्य पदार्थ व अन्य पदार्थ ह्यांच्या कारखानदारांस व तूप—तेलाच्या व्यापाऱ्यांस नित्य लागणारे डबे नमुन्याप्रमाणें निरनिराळ्या सुबक आकारांत तयार करून दिले जातात. किमान १,००० डब्यांची ऑर्डर स्वीकारली जाते. मागणी फार असल्यानें, फक्त क्रमवारच माल पुरविला जातो. दरासाठीं सँपल पाठवून चौकशी करावी.

कंपनीचा स्टॅच्युटरी रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे.

★ शेअर विक्री झपाट्यानें चालू आहे. पहिल्याच वर्षी किमान ६ टक्के डिव्हिडंड भागीदारांना देतां येईल अशी संचालक मंडळास खात्री वाटत आहे.

★ ठेवी, ३ वर्षें मुदतीच्या, १ लक्ष रुपयांच्या, घेणेसाठीं संचालक मंडळानें नुकतीच परवानगी दिली आहे. दराबद्दल व नियमांसाठीं खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व. न. म्हैसूर,
मॅनेजर, सुप्रिम म्युच्युअल ॲ. कं. लि.
८६६, सदाशिव, पुणें २

—अथवा—

कोकणे, म्हैसूर आणि कं.
मॅनेजिंग एजंट्स
दि ट्रिनिटी मेटल वर्क्स लि.,
३६[illegible]भाई पटेल रोड, मुंबई ४.

## विविध माहिती

**सरकार-रेल्वे करार संपणार**—हिंदुस्थान सरकारनें दार्जिलिंग हिमालयन् रेल्वे कंपनींशीं असलेला करार रद्द करण्याचें ठरवून ती रेल्वे आपल्या ताब्यांत घेण्याचा निर्णय घेतला आहे. करार रद्द करण्यासंबंधीची एक वर्षाच्या मुदतीची नोटिस ता. २० आक्टोबर रोजीं बजावण्यांत आली आहे.

**परदेशी धान्याची आयात**—जानेवारी १९४८ मधील अमेरिकन धान्याच्या निर्यातीचे आकडे अमेरिकन सरकारच्या शेतकी खात्यातर्फे जाहीर करण्यांत आले आहेत. डिसेंबर १९४७ मध्यें एकूण ८,७१,८०० टन धान्य निर्यात करण्यासाठी मुक्रर झालें होतें. जानेवारी १९४८ मध्यें एकूण ९,६०,५०० टन धान्य निर्यात होईल. त्यापैकीं हिंदुस्थानकडे ८,५०० टन गहूं, १२,००० टन आटा आणि १७,००० टन इतर धान्य इतकी निर्यात होणार आहे.

**तांत्रिक शिक्षणाला मदत**—ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन ह्या संस्थेच्या कोऑर्डिनेटिंग कमिटीची बैठक श्री. नलिनी रंजन सरकार ह्यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथें भरली होती. देशांतील महत्त्वाच्या तांत्रिक उद्योगधंद्यांचें शिक्षण देणाऱ्या संस्थांना मदत करण्याची शिफारस कमिटीनें केली आहे. ह्या मदतीचे दोन भाग करण्यांत आले असून भांडवली खर्चाच्या मदतीसाठी १॥ कोटी रुपये आणि चालू खर्चासाठी २ लाख रुपये मध्यवर्ती सरकारनें आपल्या उत्पन्नांतून द्यावे, अशी कमिटीची सूचना आहे.

**कराची बंदराचा व्यापार**—गेल्या वर्षी कराची बंदरांत स्थापत्यविषयक बांधकामासाठी ५५,३१,७७६ रुपये खर्च करण्यांत आले. त्या वर्षी बंदरांत एकूण ९३३ बोटींनीं नांगर टाकले. ह्या बोटींचें वजन २७,८२,९०८ टन भरलें. तेथील विमान तळावर ९७१ मोठीं विमानें उतरलीं. आयात व निर्यात झालेल्या मालाचें वजन २७,८८,००० टन झालें. त्याच्या मागील वर्षापेक्षां टन वजनांत २·७ टक्के घट झालेली आहे. बंदराच्या जकातीचें उत्पन्न १,४४,९३,८३६ रुपये झालें व खर्च १,१८,१०,६४१ होऊन २६,८३,१९५ रुपये शिल्लक उरले.

**हिंदुस्थानांत येण्यासाठी पासपोर्ट**—पाकिस्तानांतून हिंदुस्थानांत येणाऱ्या परकीय प्रवाशांजवळ हिंदुस्थानांत प्रवेश करण्याचा परवाना असला पाहिजे असें हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांना कळविलें आहे, अशी बातमी आहे. परकीय प्रवाशांत पाकिस्तानचे रहिवासी येत नाहींत. त्याचप्रमाणें पाकिस्तानांत प्रवेश करण्याचा परवाना हिंदुस्थानांत प्रवेश करतांना चालणार नाहीं. हिंदुस्थानांतील प्रांतिक सरकारांनीं खुष्कीच्या प्रवासमार्गाच्या सरहद्दीवर पासपोर्ट तपासण्याची व्यवस्था करावयाची असून पाकिस्तानांतून आलेल्या विमान-प्रवाशांची तपासणी हिंदुस्थानांतील तोंडाच्या विमानतळांवर करावयाची आहे.

**फिनलंडला कापसासाठी कर्ज**—एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँकेनें फिनलंडला कापसाच्या खरेदीसाठी नुकतेच ५० लाख डॉलर्सचें कर्ज दिलें.

**नारळाच्या झाडांचीं रोपें**—इंडिअन सेंट्रल कोकोनट कमिटीच्या सहाव्या बैठकींत मद्रास, मुंबई आणि आसाम ह्या प्रांतांतून नारळाच्या झाडांचीं रोपें तयार करण्यासाठीं केंद्रें उघडण्याचें ठरलें. मद्रास प्रांतांत नारळाच्या रोपांच्या सर्वांत मोठ्या बागा तयार करण्यांत येणार आहेत. ह्या बागांची संख्या पांच रहाणार असून नारळ लावणाऱ्या लोकांना दरवर्षी १,६०,००० रोपें पुरवण्यांत येतील, असा अंदाज आहे.

**हिंदी संघ राज्यासाठी परदेशी भांडवल**—ऑस्ट्रेलिआचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, मि. कॉलिन क्लार्क, हे नुकतेच दिल्लीला आले होते. कोणत्या तरी स्वरूपांत परदेशी भांडवल हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणांत आल्याखेरीज हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति खुंटेल आणि त्यामुळें राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ होणार नाहीं, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. हिंदुस्थानांतील मूलभूत उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे करावे असेंहि ते म्हणाले.

**ऑस्ट्रेलिआंतील बँकांचें राष्ट्रीयीकरण**—ऑस्ट्रेलिआंतील बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला ऑस्ट्रेलिआच्या गव्हर्नर जनरलनें इंग्लंडच्या राजातर्फे संमति दिली. ऑस्ट्रेलिआंतील ११ व्यापारी बँकांनीं राष्ट्रीयीकरणाविरुद्ध हायकोर्टकडे मनाई हुकुमाची मागणी केली आहे. ह्या बिलाला कांहीं बड्या बँकांच्या आणि तीन स्वायत्त घटक सरकारांचा जबर विरोध आहे.

**हिंदुस्थानांतील जमीनदारीचा शेवट**—डिसेंबरच्या मध्याच्या सुमारास हिंदी संघांतील प्रांतिक जमीन-महसूल मंत्र्यांची एक परिषद दिल्ली येथें भरणार असल्याचें समजतें. ही परिषद आखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या प्रेरणेनें भरणार असून त्यांत हिंदुस्थानांतील जमीनदारी नष्ट करण्यासाठी एक कार्यक्रम ठरविण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे. प्रत्येक सरकारचा ह्या प्रश्नासंबंधीं काय करण्याचा विचार आहे, तें समजून घेण्यासाठी काँग्रेसच्या जनरल सेक्रेटरींनीं प्रांतांच्या महसूल मंत्र्यांकडे एक प्रश्नपत्रिकाही धाडली आहे.

**इंटरनॅशनल बँकेचे बाँड करमाफ**—अमेरिकेंत न रहाणाऱ्या परकीयांनीं अगर परकीय संस्थांनीं जर इंटरनॅशनल बँकेचे बाँड घेतले असतील तर त्यांच्या व्याजावर अमेरिकेंत प्राप्तीचा कर घेतला जाणार नाहीं, असें अमेरिकेच्या फडणिशी खात्यानें जाहीर केलें आहे.


## The Brihan Maharashtra Sugar Syndicate Limited, Poona 2.

## NOTICE.

The thirteenth Annual General Meeting of the Share-Holders of The Brihan Maharashtra Sugar Syndicate Ltd., Poona 2, will be held on Wednesday the 31st December 1947 at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2 to transact the following business:—

1. To receive and adopt the Directors Report and Audited Statements of Accounts for the year ended 30th September 1947.

2. To sanction the payment of Dividend for the above mentioned period.

3. To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.

4. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By order of the Board of Directors,

Poona 2
7th December 1947

C. G. Agashe & Co.
Managing Agents.

*Note*:—The transfer books of the Company will be closed from 16th December 1947 to 5th January 1948 (both days inclusive).

The dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra Ltd., Poona 2 on and after the 7th February 1948.

# अर्थ

बुधवार, ता. १० डिसेंबर, १९४७



मा. वा. गो. काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## अंदाजपत्रकावरील उद्बोधक चर्चा

मध्यवर्ती विधिमंडळांत अंदाजपत्रकावर उद्बोधक चर्चा झाली. श्री. मुनशी म्हणाले कीं, फाळणीमुळें निर्माण झालेल्या आर्थिक प्रश्नांचें निश्चित स्वरूप अर्थमंत्र्यांच्या भाषणावरून स्पष्ट होत नाहीं. ज्या धंद्याच्या बाबतींत राष्ट्रीयीकरण करणें अशक्य किंवा अनिष्ट असेल असे धंदे खाजगी मालकांकडेच ठेवणें इष्ट आहे, असें त्यांनीं सुचविलें. हिंदुस्थानांतील पोलाद व जहाज-वाहतूक हे धंदे खाजगी मालकीचे असूनहि कार्यक्षम आहेतच. मृत्यूसमयींचे कर बसविले जावे असेंहि त्यांनीं सुचविलें. मि. करिमुद्दिन ह्यांनीं अर्थ-मंत्र्यांनीं भर दिलेल्या 'संमिश्र अर्थव्यवहारा' बद्दल संशय व्यक्त केला. कारण अशी व्यवस्था राष्ट्रीयीकरणाच्या आड येईल. श्री. दिवाकर ह्यांनीं सुचविलें कीं शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी शक्य तितका खर्च धरणें, पाटबंधारे, खतें इ. गोष्टींवर करावा, बैठ्या उद्योग-धंद्याला मदत करावी व मजूर वर्गानेंहि आपली उत्पादन-क्षेत्रांतील जबाबदारी ओळखावी. अन्न-नियंत्रणें उठविल्यामुळें महागाई जास्त वाढेल या बाबतींत सरकारनें काय तरतूद केली आहे असा सवाल श्री. कृष्णमाचारी ह्यांनीं केला. आसाम व ओरिसा प्रांतांना मध्यवर्ती सरकारनें प्राप्तीवरील कराचा किंवा चहाच्या निर्यात जकातीचा जास्त वाटा द्यावा असें सुचविण्यांत आलें. श्री. सुब्रमण्यम् ह्यांनीं सुचविलें कीं, अंदाज-पत्रकाची खरी कसोटी म्हणजे सर्वसाधारण मनुष्याचा राहाणीचा दर्जा सुधारण्याला त्यामुळें किती मदत होते ही होय. पंडित कुंझरू पूर्वीं वाढत्या लष्करी खर्चावर नेहमी टीका करीत असत, परंतु सध्यांच्या स्थितींत आजचा लष्करी खर्च वाजवी आहे, व वैमानिक आणि नाविक विभागांवर जास्त खर्च करण्यांत यावा असेंच त्यांनीं सुचविलें. सर्व प्रकारें उत्पादन वाढविण्यांत यावें व धान्याच्या आयातीवर अवलंबून राहूं नये असेंहि मत मांडलें गेलें.

अर्थमंत्री श्री. चेट्टी म्हणाले कीं, आज आपल्या देशाला उत्पादन कितीतरी पटींनीं वाढविण्याची विशेष आवश्यकता आहे. सरकारी धोरणाचे सर्व प्रयत्न ह्या दृष्टीनेंच पुढें पडले पाहिजेत. राष्ट्रीयीकरणाचें धोरण स्वीकारलें तरीहि आपल्या देशाची आर्थिक परिस्थिति अशी आहे कीं, उत्पादन क्षेत्रांत पुढें कित्येक वर्षे खाजगी प्रयत्नांना अवसर राहील. भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत संपत्तीच्या विभागणीकडे लक्ष दिलें जात नाहीं. हा दोष आपण शक्य तितका दूर केला पाहिजे. थोड्या व्यक्तींच्याच हातांत संपत्ति केंद्रीभूत होणें ही गोष्ट अनिष्ट आहे. कर-पद्धतीची उभारणी धंद्यांतील भांडवल गुंतवणुकीला उत्तेजन देणारी अशीच राहिली पाहिजे. तात्त्विक मतभेद कितीहि असले तरी एकमत होणाऱ्या बाबीहि पुष्कळ आहेत, व त्यांवर आपण आपले प्रयत्न केंद्रीभूत केले पाहिजेत. महागाई थांबवून धरण्यासाठीहि आपल्याला उत्पादन वाढविलें पाहिजे. आजच्या अडचणींपैकीं वहातुकीची अडचण सर्वांत मोठी आहे. कोळशाचें उत्पादन वाढूनहि, वहातुकीचीं साधनें अपुरीं पडत असल्यामुळें औद्योगिक उत्पादनावर अनिष्ट परिणाम होत आहे. पूर्वीच्या सरकारनें इंजिनें बांधण्याचे कारखाने काढले नाहीत, त्याचे दुष्परिणाम आज आपणाला जाणवत आहेत. कोळशाच्या वहातुकीसाठी सरकार जहाजें मिळविण्याच्या प्रयत्नांत आहे. स्टील पॅनेलनें बिहार व मध्यप्रांतांत प्रत्येकीं पांच लक्ष टन वार्षिक उत्पादनाचे पोलादाचे कारखाने काढावयाचें सुचविलें असून त्याची अंमलबजावणी लवकरच होईल. मजुरांना नफ्याच्या प्रमाणांत किती वाटा मिळावा याचाहि विचार एक समिति करीत आहे. नियंत्रणें अयशस्वी झाल्यामुळें तीं रद्द करणें हाच उपाय आहे. परंतु अनुभव पाहूनच तीं सावकाश दूर केलीं जातील. स्टर्लिंग कर्जाच्या वाटाघाटींबद्दल ब्रिटिश प्रतिनिधी दिल्ली येथें जाणार आहेत.

सरकाच्या कर्ज उभारण्याच्या धोरणाबद्दल अर्थमंत्री म्हणाले कीं, स्वस्त दरांत कर्ज उभारण्याचें धोरण सर आर्चीबॉल्ड ह्यांनीं यशस्वी करून दाखविलें होतें. सरकारची पत कर्ज उभारण्याच्या यशस्वितेवर अवलंबून असते. अलिकडे सरकारला कर्ज देण्याबद्दल जनतेमध्यें विशेष उत्साह वाटत नाहीं. जमाखर्चाच्या परिस्थितीच्या दृष्टीनेंहि ही परिस्थिति सुधारली पाहिजे. कारण हल्लींच्या काळांत प्रत्येक सुधारलेल्या सरकारला खर्च कर्जें उभारूनच करावा लागतो, तो साधारपणें उत्पन्नाच्या साधनांतून भागविला जात नाहीं. स्वस्त कर्ज उभारणीच्या धोरणावर तज्ज्ञ लोकांकडूनहि टीका केली जाते याची जाणिव सरकारला आहे. परंतु एकदां एखादें धोरण स्वीकारलें कीं त्यांत बदल करणें फार कठीण जातें. यापुढें या बाबतींत संपादन केलेली भूमिका टिकविण्याकडे सरकारचें धोरण राहील. भावी काळांत औद्योगीकरणासाठीहि सरकारला कर्ज लागेल. चालू वर्षाच्या अखेरीस कर्ज उभारावें लागेल. तरी जनतेनें सरकारी धोरणावर विश्वास ठेवून सरकारी कर्ज विकत घेणें फार आवश्यक आहे. आतांची परिस्थिति अशी आहे कीं, कर-पद्धति, राष्ट्रीयीकरण, खाजगी उद्योगधंद्यांचें महत्त्व व स्थान इ. सर्व बाबतींत जनतेनें सरकारनें मदत करावी असेंच अधिकृत धोरण रहाणार आहे.

---

**मद्रास प्रांतांतील जनरल सेल्स टॅक्स**—मद्रास प्रांताच्या सरकारनें विक्री कर कायदा दुरुस्त करून सालिना १२ कोटी रुपये उत्पन्न येण्याची व्यवस्था केली आहे. मोटारी, रेडिओ, सारख्या चैनीच्या वस्तूंवर अधिक दरानें कर बसविला असून वृत्तपत्रें व नियतकालिकें ह्यांच्यावर मुळांतच रुपयांत फक्त तीन पै कर घेण्यांत यावयाचा आहे. वृत्तपत्रांतील जाहिरातींवर कर बसविण्याचा कायदा तयार होत असून तो मंजूर झाला म्हणजे वृत्तपत्रांवरील विक्री कर रद्द करण्यांत येणार आहे.

**लांब धाग्याच्या कापसाची निर्यात**—लांब धाग्याच्या कापसाची निर्यात कोणत्याही देशाकडे करावयाची नाहीं असा हुकूम हिंदुस्थान सरकारच्या पुरवठा खात्यानें काढला आहे. निर्यात बंदी असलेल्या देशांत पाकिस्तानचाही समावेश आहे. १९४७-४८ सालीं पाकिस्तानांतून ह्या प्रकारच्या कापसाचा पुरवठा कितपत होऊं शकेल त्याचा अंदाज लागेपर्यंत ही निर्यात बंदी अंमलांत रहाणार आहे.

## मुंबई प्रां. स. मार्केटिंग परिषदेचें अधिवेशन

### मालविक्रीची सहकारी तत्त्वांवर संघटना

मुंबई प्रांतिक सहकारी मार्केटिंग परिषदेचें दुसरें अधिवेशन मुंबई येथें शेतकी खात्याचे मंत्री श्री. एम. पी. पाटील ह्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेंच पार पडलें. मुंबई प्रां. स. मार्केटिंग सोसायटी लि. चे चेअरमन दि. ब. हिरालाल एल. काजी ह्यांच्या स्वागतपर भाषणानंतर गृहमंत्री ना. देसाई ह्यांनीं परिषदेचें उद्‌घाटन केलें. परिषदेच्या नियंत्रित मार्केट विभागाचें उद्‌घाटन अर्थमंत्री ना. मेहता ह्यांनीं केलें व पुरवठामंत्री ना. देसाई ह्यांनींहि विस्तृत भाषण करून परिषदेंत भाग घेतला.

आतांपर्यंत, सहकारी चळवळीनें शेतकऱ्यांना भांडवल पुरवठा करण्याकडेच मुख्यतः लक्ष दिलें; आतां उत्पादन व विक्री ह्यांकडे अधिक लक्ष देण्यास प्रारंभ झाला आहे. शेतकऱ्याची शेती किफायतशीर होण्यास, भांडवल पुरवठ्याइतकेंच, किंवा त्याहूनहि अधिक प्रमाणांत, कार्यक्षम उत्पादनाचें व विक्रीचें महत्व आहे ही गोष्ट सर्वांस पटली आहे. शेतकऱ्याच्या मालविक्रीची सहकारी पद्धतीनें कार्यक्षम व्यवस्था कशी होईल, ह्याचाच विचार परिषदेनें मुख्यतः करावयाचा होता. शेतकी मंत्र्यांनीं नियंत्रण-काळांत सहकारी संस्था करीत असलेल्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला व नियंत्रणोत्तर काळांत सहकारी संस्था अधिक उपयुक्त कार्य करूं शकतील असा विश्वास त्यांनीं प्रकट केला. आजच्या नियंत्रणांच्या काळांत विक्री संस्थांचें क्षेत्र मर्यादित होणें स्वाभाविक आहे. तेव्हां, ह्या परिस्थितींत मार्केटिंगचा अर्थ व्यापक करून शेतीच्या व बिगर शेतीच्या सर्व प्रकारच्या खरेदी-विक्रीचा त्यांत समावेश करणें क्रमप्राप्तच झालें आहे, ही गोष्ट दि. ब. काजी ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत स्पष्ट केली. ह्यासंबंधांत वेगवेगळ्या सहकारी संस्थांचें कार्यक्षेत्र अलग कसें ठेवता येईल हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. बँकांनीं मालविक्रीस सहाय करण्याचे कामीं जरी पुढाकार घेऊन महत्त्वाचें प्राथमिक कार्य केलें असलें, तरी मार्केटिंग सोसायट्यांनीं तें सर्वस्वी अंगावर घेण्याची वेळ आतां आली आहे, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. शेतकऱ्यांस वेगवेगळ्या कारणांसाठी कर्जें दिलीं जातात, परंतु त्यांच्या मालाची खरेदी-विक्री मार्केटिंग सोसायट्यांमार्फतच व्हावी अशी अट घातली जाणें अगत्याचें आहे. ह्या संबंधांत कर्जें देणाऱ्या सहकारी संस्था योग्य दिशेनें पाऊल टाकीत आहेतच.

### मंजूर झालेले ठराव

परिषदेनें मंजूर केलेल्या ठरावांत मुंबई प्रांतिक सहकारी मार्केटिंग सोसायट्यांच्या असोसिएशनच्या स्थापनेस अग्रस्थान देण्यांत आलेलें आहे. सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणणें, आवश्यक ती माहिती गोळा करणें, सभासद-सोसायट्यांच्या कामास पैसा मिळवून देण्याचा प्रयत्न करणें, इत्यादि उद्देश ह्या असोसिएशनचे रहातील. परचेस, सेल व सप्लाय सोसायट्या, यूनियन्स, फेडरेशन्स, मल्टिपर्पज सोसायट्या, कंझूमर्स सोसायट्या वगैरेस असोसिएशनचे सभासद होता येईल. जिल्ह्याकरितां बोर्ड ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज व प्रांताकरितां मुंबई येथें प्रांतिक बोर्ड ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज स्थापण्यांत येतील. असोसिएशनचें काम पहाण्यासाठी एक्झिक्यूटिव्ह कमिटीची योजना आहे.

कोऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटीच्या शिफारसी तात्काळ अंमलांत आणण्यांत याव्या आणि तालुका निहाय आणि जिल्हे निहाय खरेदी-विक्री संघ स्थापन करण्यांत यावे व सहकारी संस्थांकडून कर्ज घेणारांनीं सहकारी मार्केटिंग संस्थांमार्फतच माल विकावा अशी सूचना दुसऱ्या ठरावानें केली आहे.

युद्धजन्य परिस्थितीमुळें आणि रेशनिंगमुळें गेल्या कांहीं वर्षांत कंझूमर्स सहकारी चळवळीस बरीच चालना मिळालेली आहे. परंतु, ही चळवळ दृढमूढ व्हावी ह्या दृष्टीनें तिचे संबंधांतील सरकारी धोरण स्पष्टपणें जाहीर होणें आवश्यक आहे. ह्या बाबत मागणी करणारा एक ठरावहि परिषदेनें मंजूर केला आहे. सहकारी मार्केटिंग-संबंधीं इतरहि अनेक ठराव परिषदेनें केले, त्यांत मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटांत फळविक्रीचें एक सहकारी दुकान स्थापण्याविषयींहि एक ठराव होता.

ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिट्यांच्या प्रतिनिधींच्या सभेंतहि त्यांच्या हितसंबंधाविषयीं महत्वाचे ठराव झाले. मार्केट कमिट्यांना योग्य किंमतीस मार्केटसाठी जमिनी मिळवून देणें; पाणी, ड्रेनेज, उजेड, तोंडाचे रस्ते, इत्यादि सुखसोई स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत उपलब्ध करून देणें; लोखंड, सिमेंट, इत्यादि मार्केट कमिट्यांस मिळण्याची व्यवस्था करणें; सरकारनें ठिकठिकाणीं नियंत्रित जिनसांच्या साठ्यासाठी बांधलेली कोठारें सहकारी खरेदी-विक्री संघांस अथवा रेग्युलेटेड मार्केट कमिट्यांस देणें; मार्केट कमिटी स्थापन होण्यापूर्वींच मार्केटासाठी जागा अक्वायर करणें; मार्केट कमिट्यांची आजच्या विशिष्ट परिस्थितीमुळें तुटीचीं झालेलीं अंदाजपत्रकें समतोल करण्यासाठी त्यांस सरकारनें आर्थिक मदत देणें; मार्केटांतील खरेदी-विक्रीवर देखरेखीसाठी शेतकी-मार्केटिंग खात्यांतील इन्स्पेक्टर्स नेमणें; शहरांतील फळें व भाज्या ह्यांच्या मार्केटांतील व्यवहारावर सरकारनें नियंत्रण ठेवणें; मार्केट कमिट्यांस लायक सेक्रेटरी पुरवणें, वगैरे विषयांवर उपयुक्त ठराव करण्यांत आले.

### पौंडी शिलकेची वाटणी

हिंदुस्थान सरकारचे अर्थमंत्री श्री. षण्मुखम् चेट्टी ह्यांनीं हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील पौंडी शिलकीबाबत पुढीलप्रमाणें उत्तर घटना समितींत (कायदेमंडळ) दिलें:—"पौंडी शिलक ही रिझर्व्ह बँकेचीं मालमत्ता असून तींतून मुक्त केलेल्या रकमा हिंदी संघ आणि पाकिस्तान ह्या वसाहतींत वाटल्या जातात. ह्या वसाहतींच्या आयात व्यापारासाठी रकमांचा विनियोग करण्यांत येतो." आयातीसंबंधी माहिती देतांना अर्थमंत्र्यांनीं आणखी माहिती सांगितली ती अशी: हिंदी संघ आणि पाकिस्तान ह्यांचे आयातीबद्दलचें धोरण फाळणीपूर्वींचेच आहे. आयातीसाठी आयात वस्तूंचे तीन वर्ग करण्यांत आले आहेत. (१) ज्या वस्तूंच्या आयातीला हुंडणावळीचें बंधन नाहीं त्या, (२) ज्यांना असें बंधन आहे त्या आणि (३) ज्या वस्तूंकरितां परकीय हुंडणावळ द्यावयाची नाहीं त्या. पहिल्या वस्तूंच्या आयातीसाठी दोन्ही वसाहती परवाने देत आहेत. तिसऱ्या वर्गांतील वस्तूंसाठी कोणत्याच वसाहतीनें परवाने दिलेले नाहींत. दुसऱ्या वर्गांतील वस्तूंच्या आयातीसाठी हिंदुस्थानला २६ कोटींची हुंडणावळ आणि पाकिस्तानला ६॥ कोटींची हुंडणावळ ३१ डिसेंबरअखेर देण्याचें ठरलें आहे.

**मद्रास सरकारची विमा-योजना**—साऊथ इंडियन इन्शुरन्स असोसिएशनची वार्षिक परिषद नुकतीच झाली. परिषदेचें उद्‌घाटन करतांना मद्रास प्रांताचे उद्योगमंत्री, श्री.रेड्डी, ह्यांनीं मद्रास सरकार आपली स्वतःची विमायोजना अंमलांत आणण्याचा विचार करीत असल्याचें सूचित केलें.

# पुणें सें. को. बँकेचा जिल्ह्यांतील सहकारी सप्ताह

पुणें सें. को. बँक लि. मार्फत पुणें जिल्ह्यांत ता. २६ ऑक्टोबर १९४७ ते ता. ३१ ऑक्टोबर १९४७ अखेर पुणें जिल्ह्यांत सहकारी सप्ताहानिमित्त ठिकठिकाणीं त्या त्या क्षेत्रांतल्या सहकारी सोसायट्यांचे प्रतिनिधी व स्थानिक सहकारी कार्यकर्ते व सोसायट्यांचे सभासद यांच्या सभा भरवून त्यांत मुख्यतः सहकारी चळवळ व शेतकी सुधारणा यासंबंधीं व्याख्यानें देण्यांत आलीं. या सभांसाठी पुण्यांतील कांहीं डायरेक्टर्स व बँकेचे अंमलदार हे मुद्दाम जात असत. या सभांचा त्रोटक वृत्तांत दिल्यास तो बराच उद्बोधक होईल असें वाटल्यावरून तो खालीं देत आहोंत.

### पाटस

ता. २६-१०-४७ रोजीं पाटस, ता. दौंड, येथें श्री. श्री. रा. पाळंदे, बँकेचे डायरेक्टर, यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. सभेस सात-आठ सोसायट्यांचे प्रतिनिधी, तालुक्यांतील पांच सहा वेगवेगळ्या खात्यांचे अंमलदार व सुमारें दीडशें मंडळी हजर होती. मुख्य वक्ते या नात्यानें श्री. पाळंदे हे म्हणाले कीं, १५ ऑगस्ट १९४७ नंतर आपला देश स्वतंत्र झाला असून सहकारी चळवळीस योग्य तें वळण देणें हें आतां आपल्या प्रतिनिधींच्याच हातीं आलेलें आहे. प्रांतिक सरकारें हीं आतां लोकप्रतिनिधींचीं असल्यानें आपल्या गरीब शेतकऱ्यांचं ज्यायोगें आर्थिक जीवन सुधारेल असे वेगवेगळे कायदे मंजूर करण्यांत येत असून त्यांची शक्य तितक्य. तातडीनें अमलबजावणी होत आहे. शेतकरी कर्जनिवारण कायदा हा आतां आपल्या जिल्ह्यांत अमलांत आला आहे व सावकारी नियंत्रण कायद्दा हा आतां लवकरच सुरू होईल. सबब शेतकऱ्यांनीं आपल्या कर्जाबाबतच्या सर्व गरजा सहकारी संस्थांमार्फतच भागवून घेतल्या पाहिजेत व तेंच त्यांच्या अंतिम हिताचें होईल.

### भिगवण

ता. २७-१०-४७ रोजीं भिगवण, ता. इंदापूर, येथें श्री य. द. खोले, बँकेचे व्हा. चेअरमन, यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. सदर सभेस सुमारें दोनशें स्थानिक मंडळी व आसपासच्या कांहीं सोसायट्यांचे प्रतिनिधी असे हजर होते. तालुक्याचे मामलेदार व इतर चार पांच वेगवेगळे अंमलदार हेही उपस्थित होते. श्री. खोले यांनीं मुख्य वक्ते म्हणून सहकारी संस्थांची उपयुक्तता व नवीन राज्यव्यवस्थेंत त्यांचेवर पडणारी जबाबदारी हीं निवेदन करून सभासदांनीं आपल्या सोसायटीशीं निष्ठापूर्वक व्यवहार करून शेतकऱ्यांनीं आपली आर्थिक उन्नति करून घ्यावी असा जमलेल्या मंडळीस सल्ला दिला.

### खरपुडी बुद्रुक

ता. २८-१०-४७ रोजीं खरपुडी बुद्रुक, ता. खेड, येथें श्री. वा. के. जोशी, बँकेचे-डायरेक्टर, यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती. सदर सभेस सुमारें दहा सोसायट्यांचे प्रतिनिधी व स्थानिक सोसायटीचे बहुतेक सर्व सभासद अशी सुमारें दीडशें मंडळी उपस्थित होती. श्री. बाळकृष्ण पर्वतराव पाटील व खेड खरेदी-विक्री संघाचे चेअरमन श्री. घुमटकर यांनीं सहकारी सोसायट्यांची सद्यःस्थिति व त्यांना येणाऱ्या अडचणी सभेस निवेदन केल्या. श्री. शिंदे आणि रूरल डेव्ह. इन्सपेक्टर यांनीं खेड तालुक्याच्या पश्चिम भागांत सुरू असलेल्या ग्रेनडेपो ( धान्य-बँका ) यांच्या कारभारांत कशी प्रगति झालेली आहे तें सभेस सांगितलें. श्री. वा. के. जोशी यांनीं पाश्चात्य देशांतील व हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीची तुलनात्मक माहिती सांगून प्रगतीच्या दृष्टीनें आपणांस अद्याप बराच मोठा पल्ला गांठावयाचा आहे असें ते म्हणाले व त्यादृष्टीनें सभासदांनीं प्रयत्न करावा असा त्यांनीं सल्ला दिला.

### आळे

ता. २८-१०-४७ रोजीं दुसरी एक सभा आळे, ता. जुन्नर, येथें भरली होती. सभेस सुमारें १०० मंडळी हजर होती व त्यांत आसपासच्या आकरा सहकारी सोसायट्यांचे प्रतिनिधी आलेले होते. या सभेसाठी पुण्याहून श्री. य. धों ओगले हे गेले होते. सभेचे अध्यक्ष स्थानिक पुढारी श्री. दगडू रामजी भुजबळ हे होते. श्री. ओगले यांनीं तालुक्यांतील सहकारी सोसायट्यांच्या कारभाराची त्रोटक माहिती सांगून शेतकऱ्यांनीं आपल्या भाताची विक्री सहकारी संस्थांच्या मार्फतच करण्यांत त्यांचें कसें हित आहे तें विषद केलें. श्री. विष्णूपंत चौगुले ( वडगांव भिकार ) यांनीं हंगामांत वैरण व चारा सांठवून ठेवण्याची कल्पना सांगितली व या कामीं सोसायट्यांनीं आपल्या सभासदांना विशेष प्रोत्साहन द्यावें असें सुचविलें.

### निरा

ता. २९-१०-४७ रोजीं निरा स्टेशनवर एक फार मोठी सभा भरली होती. या सभेस सुमारें चारपांचशें लोक हजर होते. ही सभा निंबूत सोसायटीचे विद्यमानें भरली होती. सभेचे अध्यक्ष अकलूज येथील पुढारी राजे शंकरराव मोहिते पाटील हे असून आमदार व्यंकटराव पवार हेही हजर होते. सभेसाठी पुण्याहून बँकेचे व्हा. चेअरमन श्री. य. द. खोले हे मुद्दाम गेले होते. श्री. व्यंकटराव पवार यांनीं सातारा जिल्ह्यांतील सहकारी संस्थांसंबंधी आपले स्वतःचे बरेच अनुभव सांगून सहकारी सोसायट्यांचे सभासदांनीं आपली जबाबदारी प्रामाणिकपणें व निर्भिडपणें पार पाडल्यास शेतकऱ्यांची उन्नति झाल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं, असें ते म्हणाले.

### सासवड

ता. ३०-१०-४७ रोजीं सासवड येथें श्री. गोटीराम पवार यांचे अध्यक्षतेखाली सभा भरली होती. या सभेस सुमारें ५० मंडळी हजर होती. श्री. जाधव सुपरवायझर यांनीं तालुक्यांतील सहकारी कामकाजाचें सिंहावलोकन करून शेतकऱ्यांनीं या संस्थांचा अधिक फायदा घ्यावा व त्यांतच त्यांचें हित आहे असें त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला.

### घोडनदी

ता. ३१-१०-४७ रोजीं घोडनदी ( शिरूर येथें ) श्री. ग. र. तुळशीबागवाले यांचे अध्यक्षतेखाली सभा भरली. या सभेस सुमारें ४० मंडळी व आठ-दहा सुशिक्षित स्त्रिया हजर होत्या. सभेंत वेगवेगळ्या मंडळींनीं आपले अनुभव सांगितले व त्यांत मुख्यत्त्वें संस्थांच्या दैनंदिन कारभारांत येणाऱ्या अडचणींचाच विचार झाला. शिरूर येथील हेल्थ सेंटरमधील सौ. कोकमठाणकर यांनीं स्त्रियांनीं सहकारी चळवळींत हल्लीपेक्षा अधिक भाग घ्यावयास पाहिजे असें प्रतिपादन केलें. श्री. तुळशीबागवाले यांनीं सोसायट्यांचा कारभार पद्धतशीर रीतीनें चालल्यास त्यांना बँकेकडून कॅश क्रेडिट पद्धतीनें कर्जें मिळतील असें आश्वासन दिलें. याच पद्धतीनें सदर सोसायट्यांनीं आपल्या सभासदांस कॅशक्रेडिट मंजूर केल्यास त्यांच्या दैनंदिन गरजा तात्काळ भागविण्याच्या दृष्टीनें सोईचें होतें, हेंही त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें.

## सहकारी दिनाच्या सभा

निंबूत (ता. भिमथडी, जि. पुणें) येथें २६-१०-४७ ते १-११-४७ सात दिवस सहकारी सप्ताह तेथील विविधकार्यकारी सहकारी सोसायटीतर्फे साजरा करण्यांत आला. सात सभांपैकीं दोन सभा निरा येथें भरविण्यांत आल्या. ता. २६ रोजीं श्री. यशवंतराव साहेबराव काकडे ह्यांचे अध्यक्षतेखालीं श्री. कृष्णराव खाशेराव काकडे ह्यांनीं सप्ताहाचें उद्घाटन केलें. ता. २७ रोजीं माजी आमदार श्री. दादासाहेब जगताप ह्यांचे अध्यक्षतेखालीं श्री. बाबुराव भोसले ह्यांचें भाषण झालें. ता. २८ रोजीं निरा येथें रावबहादुर शेंबेकर ह्यांचे अध्यक्षतेखालीं प्रांत ऑफिसर श्री पाटील ह्यांचें भाषण झालें. त्यावेळीं श्री. मुळीक ह्यांनींहि उद्बोधक भाषण केलें. निंबूत सोसायटीचे चेअरमन, श्री. मुगूटराव साहेबराव काकडे देशमुख, ह्यांनीं समाजांतला एकमेकांतील द्वेषभाव नष्ट करण्याचें अगत्य प्रतिपादलें. रा. ब. शेंबेकरांनीं नीतिमत्तेचें महत्त्व सांगितलें. ता. २९ च्या निरा येथील श्री. शंकरराव राजे मोहिते, अकलुज, ह्यांच्या अध्यक्षतेखालील सभेंत श्री. रावसाहेब खोले ह्यांनींहि सहकारी चळवळीस नीतीच्या पायाची आवश्यकता कशी आहे, हें दाखवून दिलें. आपल्यांतील पारतंत्र्याचा मानसिक वारसा दूर करण्यास आमदार व्यंकटराव पवार ह्यांनीं सांगितलें. ता. ३० व ३१ रोजीं निंबूत येथेंच कार्यक्रम झाले. त्यावेळीं सोसायटीचे मॅनेजर श्री. जी. बी. काटकर ह्यांनीं सहकारी चळवळीच्या विविध अंगांचें दिग्दर्शन केलें. ता. १ नोव्हेंबर रोजीं सप्ताहाचा समारोप समारंभ आमदार बी. पी. गायकवाड ह्यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला. त्यावेळीं निरा कालव्याचे ए. इंजिनिअर रा. ब. जोशी ह्यांनीं, कालव्यांसाठीं जमिनींचा त्याग करणारांचीं कालव्यावर पिकें काढणारांनीं आठवण ठेवून, म्हणजे आपलें नागरी कर्तव्य ओळखून, व्यापक सहकार्य दाखवावें असें सुचविलें. भिमथडीचे मामलेदारसाहेब, श्री कृ. खा. काकडे, श्री. भोंगाळे, इत्यादींचीं भाषणें व अध्यक्षीय समारोप झाल्यानंतर सोसायटीचे चेअरमन श्री. मुगूटराव काकडे ह्यांनीं आभार मानले.

धुळें येथें म्युनिसिपल हॉलमध्यें श्री. डी. एन. काळे, एलएल. एम., डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज्ज, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सहकारी दिन साजरा झाला. डि. को. ऑफिसर, ह्यांनीं जिल्ह्यांतील गतवर्षीच्या सहकारी प्रगतीचा आढावा घेतल्यावर, रावसाहेब रणसिंग, श्री. मुधोळकर वकील, श्री. सौ. रमाबाई कोतवाल, जिल्हा लो. बोर्ड अध्यक्ष श्री. तात्यासाहेब पाटील, ह्यांचीं भाषणें झालीं.

नाशिक येथील सहकारी दिनास लोकनायक माधव श्रीहरी अणे हे अध्यक्षस्थान लाभले होते. सहकारी दिन समितीचे अध्यक्ष श्री. आर. व्ही. वंडेकर, सरदार विंचूरकर, ऑडिटर व री. ऑफिसर श्री. चौधरी, प्रो. पुराणिक, इत्यादींचीं भाषणें झालीं. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत सिलोनमधील सहकारी चळवळीच्या वाढीची हकीकत सांगून सहकारी स्टोअर्सचें महत्त्व वर्णन केलें.

तासगांव येथें ता. को. सुपरवायझिंग युनियनतर्फे सहकारी दिन श्री. वि. रा. पागे वकील ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

सातारा येथें जि. को. सु. युनियन बोर्डाच्या एज्युकेशन कमिटीच्या विद्यमानें रावबहादूर दुदुस्कर ह्यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी दिनाची सभा भरविण्यांत आली होती. बोर्डाचे चेअरमन श्री. डी. पी. पाटील व जिल्हा ऑर्गनायझर श्री. एन. आर. गुजर ह्यांचीं अध्यक्षांप्रमाणेंच समयोचित भाषणें झालीं.

अहमदनगर येथें न. डि. अ. सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत श्री. अच्युतराव पटवर्धन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सहकारी दिन पाळण्यांत आला. ते म्हणाले, "नफ्याच्या उद्देशाऐवजी सेवेच्या उद्देशानेंच स्वतंत्र हिंदुस्थानांतील सर्व व्यवहार चालले पाहिजेत. शेती सुधारल्याविना केवळ औद्योगीकरणाची भाषा व्यर्थ आहे. मनुष्याच्या खऱ्या विकासास पोषक होईल अशीच आपल्या चळवळीची योजना पाहिजे."

### बाँबे को. बँक्स असोसिएशन
(१९४६-४७ चा अहवाल)

मुंबई प्रांतांतील अर्बन व मध्यवर्ती सहकारी बँकांच्या वरील असोसिएशनच्या १९४६-४७ च्या अहवालावरून तिच्या उपयुक्त कार्याची कल्पना येईल. असोसिएशनच्या पटावर मुंबई शहरांतील ११, महाराष्ट्रांतील २१, गुजरातमधील ९ व कर्नाटकांतील १३ अर्बन बँका असून १४ मध्यवर्ती बँका असोसिएशनच्या सभासद आहेत. गेलीं आठ वर्षें असोसिएशनचें कार्य उत्कृष्टपणें चालू आहे, तेव्हां तिचें सभासद-बँकांच्या फेडरेशनमध्यें आतां रूपांतर करण्यांत यावयाचें आहे. असोसिएशनसाठीं स्वतंत्र पगारी सेक्रेटरी नेमण्याचेंहि ठरलें आहे. पूर्वीप्रमाणेंच, सहकारी बँकांच्या संबंधींच्या धोरणाचे प्रश्न सहकारी खातें व सभासद-बँका ह्या दोघांचेहिकडून असोसिएशनकडे सल्ल्यासाठीं येतात आणि त्यांचा विचार केला जातो. ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्ट, शेतकी पतपेढ्यांचे नाममात्र सभासद, ॲग्रि. डे. रि. ॲक्टाखालीं सहकारी गॅरंटीचा हिशेब, सोसायट्यांनीं वरील ॲक्टाखालीं तडजोड बोर्डाकडे केलेले अर्ज, गाडगीळ कमिटीच्या शिफारसी, इत्यादि प्रश्न वरील स्वरूपाचे होते. मुं. प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन श्री. आर. जी. सरय्या हे असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाचे चेअरमन असून सारस्वत को. बँकेचे चेअरमन श्री. वा. पुं. वर्दे हे ऑनररी सेक्रेटरी आहेत.

### खेड येथें खरेदी-विक्री सोसायटी

खेड (जि. पुणें) येथें खेड तालुक्याकरितां सहकारी शेतकी माल खरेदी-विक्री करणारी सोसायटी रजिस्टर झाली असून तिची पहिली सभा १७-१०-४७ रोजीं झाली. संस्थेचें उद्घाटन अर्थमंत्री, ना. मेहता ह्यांनीं केलें.





## रेल्वे एंजिनांचा बिकट प्रश्न

हिंदी संघराज्याचे वहातुक मंत्री मि. जॉन मथाई ह्यांनीं रेल्वेच्या अंदाजपत्रकांत हिंदुस्थानांतील रेल्वेच्या एंजिनांच्या प्रश्नाचा ओझरता उल्लेख केलेला होता. हिंदुस्थानसारख्या मोठ्या भूविस्तार असलेल्या देशाला रेल्वे वहातुकीचें महत्त्व किती आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. सामान्यपणें कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेंत वहातुकीच्या साधनांना उत्पादनाइतकेंच महत्त्व असतें. त्यांतून हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशाला तर वहातुक कार्यक्षम असणें फारच अगत्याचें असतें. जपान हिंदुस्थानच्या पूर्वेच्या वेशीवर धडक मारीत असतां सुद्धा ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानांत रेल्वे एंजिने बांधण्याचे कारखाने उभारण्याची दिरंगाई केली. युद्धकालीं हिंदी रेल्वेवर अतिशय ताण पडला. युद्ध चालू असलेल्या काळांत हिंदुस्थानांत फक्त ९३० नवीं रेल्वे एंजिनें आयात करण्यांत आलीं. अधिक रेल्वे एंजिनांची अत्यंत आवश्यकता असतांनाही कारखान्यांची उभारणी करण्यांत आली नाहीं.

फाळणी होण्यापूर्वी हिंदुस्थानांत ८,४०० रेल्वे एंजिनें होतीं. ह्या संख्येंत रुंद व अरुंद रुळावर चालणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या एंजिनांचा समावेश होतो. पण, त्यापैकीं २,९०० एंजिनांची मामुली आयुमर्यादा उलटून गेलेली होती. गेल्या फेब्रुआरींत सुमारें ३०० रेल्वे एंजिनें इंग्लंडमधील कारखानदारांकडून बांधवून घ्यावयाचा विचार चालला होता. परंतु, ब्रिटिश कारखानदारांना ही मागणी पुरी करता येण्याचा संभव नाहीं असें समजतें. अमेरिकेकडून लवकरच १२ रेल्वे एंजिनें येतील अशी अपेक्षा आहे. पण अमेरिकन रेल्वे एंजिनांच्या किंमती आणि आयुमर्यादा ह्याबाबतचा अनुभव फारसा उत्तेजक नाहीं असा प्रवाद आहे. युद्धकालीं आयात केलेल्या अमेरिकन एंजिनांची कार्यक्षम आयुमर्यादा २० वर्षांपलिकडे नाहीं असें म्हणतात. कॅनडा व आस्ट्रेलिआ हिंदुस्थानची मागणी पुरी करण्यास तयार आहेत असें समजतें. तसें असेल तर हिंदुस्थान सरकार ह्यासंबंधीं विचार करीलच. परदेशांतून आयात करण्याचा प्रश्न अशा रीतीनें एकंदरीनें बिकटच दिसतो. तेव्हां देशांतच एंजिनें बांधण्याचा मार्ग शिल्लक राहतो. अजमीरला अरुंद रुळावर चालणारीं एंजिनें तयार करण्याचा कारखाना आहे. पण, त्याची एंजिनें तयार करण्याची गति बेताचीच आहे. १९४५ सालीं सिंगभूम येथील रेल्वे वर्कशॉप टाटा कंपनीनें घेतलें. तथापि एंजिनें तयार करण्याचा अजून पत्ता नाहीं. सध्या असलेलीं एंजिनें दुरुस्त करून वापरावीं तर त्याचे सुटे भाग दुर्मिळ आहेत. वाहातुकमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत १९४९ सालीं नवीं रेल्वे एंजिनें परदेशांतून येऊं शकतील अशी अपेक्षा केली आहे. वर दिलेल्या माहितीवरून हिंदुस्थानांतील रेल्वे एंजिनांचा प्रश्न किती बिकट आहे ह्याची कल्पना येईल. मध्यवर्ती सरकार हा प्रश्न तांतडीनें सोडविण्याचे प्रयत्न करील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

## मार्शल योजनेला रशिआचा काट शह

'युनायटेड नेशन्स वर्ल्ड' नांवाच्या मासिकांत डॉ. चार्लस प्रिन्स ह्यांनीं एक लेख लिहून मार्शल योजना विस्कळित करण्यासाठीं सोव्हिएट रशिआ आपल्या सुवर्णसंचयाचा उपयोग करील असें प्रतिपादन केलें आहे. सोव्हिएट रशिआच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं डॉ. प्रिन्स ह्यांचा अधिकार तज्ज्ञाचा आहे असें म्हणतात. रशिआभोवती पोलादी पडदा आहे असा समज प्रचलित असतां डॉ. प्रिन्स ह्यांनीं रशिआच्या सोन्याच्या उत्पादनाचे आंकडे मिळविण्यांत यश मिळविलेलें दिसतें. त्यांच्या मतें रशिआजवळ १७०० कोटी डॉलर्सचें सोनें आहे व अमेरिकेजवळ २२०० कोटी डॉलर्सचें आहे. आपल्याशी भौगोलिक दृष्ट्या संलग्न असलेल्या देशांतून हवाही न जाईल इतक्या बंदोबस्तानें 'रुबल' चें क्षेत्र निर्माण करून, त्याच्या बाहेर मात्र रुबलचा भाव सोन्याशी जोडून, रशिआ डॉलरची आंतरराष्ट्रीय व्यापारांतील मक्तेदारी उधळून लावण्याचा प्रयत्न करील; पौंडाच्या क्षेत्रांतही रशिअन रुबल घुसेल असा डॉ. प्रिन्स ह्यांचा अंदाज आहे. असें झालें तर आंतरराष्ट्रीय किंमतीची पातळी बिघडून जाईल असेंही मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. डॉ. प्रिन्स ह्यांनीं चितारलेल्या दृश्यासंबंधी एक शंका व्यक्त करण्यासारखी आहे. सोव्हिएट रशिआ आणि त्याच्या कक्षेंतील राष्ट्रें ह्यांचा परदेशी व्यापार त्या त्या देशांतील सरकारें स्वतःच करतात. असें करतांना आपल्या देशांतील हुंडणावळी व चलन ह्यांच्यावर परदेशी व्यापाराचे अनिष्ट परिणाम होणार नाहींत ह्यासंबंधी कडेकोट दक्षता घेण्यांत येते. भांडवलशाहींतील खाजगी व्यापारामुळें आंतरराष्ट्रिय हुंडणावळींत चढउतार होतात, त्यापासून समाजवादी अर्थव्यवस्था पूर्णपणें नसली तरी बऱ्याच प्रमाणांत अलिप्त राहूं शकते. ती तशी रहावी म्हणून पूर्व युरोपांतील ८ राष्ट्रें मार्शल योजनेंत सामील झालीं नाहींत; म्हणूनच रशिआ इंटर नॅशनल मॅनिटरी फंडांत सामील झाला नाहीं. डॉ. प्रिन्स ह्यांनीं भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे नियम समाजवादी व्यवस्थेला लावण्यांत चूक केली आहे असें म्हणणें प्राप्त आहे.

## दंगाविषयक विम्याची योजना

देशांतील सध्याची अस्थिर आणि धोक्याची परिस्थिति लक्षांत घेऊन सरकारनें दंगा व सामाजिक अस्वस्थता ह्यांची जोखीम पत्करणारी विमा योजना अमलांत आणावी अशी व्यापारिवर्गाची मागणी आहे. सरकार सध्या ह्या प्रश्नाचा विचार करीत असून ह्या बाबत लवकरच अधिकृत घोषणा करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. दरम्यान बॉंबे फायर इन्शुरन्स असोसिएशन आणि कलकत्ता इन्शुरन्स असोसिएशन ह्या संस्थांची दंगाविषयक विम्याची योजना आखण्याकरितां बोलणीं चाललीं आहेत. मद्रास येथील असोसिएशनचाही विचार घेण्यांत येणार आहे. ह्या वाटाघाटींतून सामान्य रूपरेषा तयार झाली आहे असें समजतें. सरकारची घोषणा जाहीर झाल्यानंतर उभयपक्षांच्या विचारविनिमयानें संमत योजना बाहेर पडण्यास मदतच होईल. तोंपर्यंत तपशिलाचा विचार तातडीनें करण्याची गरज नाहीं. पाकिस्तान सरकारनें एक हुकूम काढून दंग्यासंबंधीं व सामाजिक अस्वास्थ्यासंबंधीं सक्तीच्या विम्याची योजना केली आहे. ह्या योजनेचें स्वरूप युद्धकालीन सक्तीच्या विम्याप्रमाणेंच ठेवण्याचा पाकिस्तान सरकारचा विचार आहे असें समजते.

## अमेरिकेंतील कोळसा-खाणींचें उत्पादन जास्त कां ?

हिंदुस्थानांतील कोळशाच्या खाणींचें कोळशाचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याचप्रमाणें, ग्रेटब्रिटनमध्यें तर फारच मोठ्या प्रमाणावर ह्याबाबत मोहीम सुरू आहे. ब्रिटिश खाणींपेक्षां अमेरिकन खाणी अधिक कार्यक्षम आहेत. ह्याविषयीं आकडेवार माहिती प्रोफेसर फिंडले शिरास ह्यांनीं लंडन टाइम्समधील एका पत्रांत दिली आहे. अमेरिकेंत खाणकामगार निम्मे असले तरी ब्रिटिश कामगारांच्या दुपटीइतका कोळसा ते काढतात, असें हे आकडे दर्शवितात. दर माणशीं दरदिवशीं उत्पादन ग्रेटब्रिटनमध्यें १ टन असलें तर अमेरिकेंत तें ५.२ टन आहे. अमेरिकन खाणींची खोली कमी आहे. तेथील खाणींत यंत्रसामुग्रीचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो आणि कामगारहि अधिक कार्यक्षम आहेत. गैरहजेरीचें प्रमाण अमेरिकेंत अत्यल्प आहे.

## हिंदी रेल्वेजच्या कारभारांत सुधारणा

स्वतंत्र हिंद सरकारच्या रेल्वे खात्याचा कारभार हिंदी आर्थिक जीवनाला पोषक होईल ह्या दृष्टीनें याच्यापुढें आखला गेला पाहिजे. रेल्वेचे माइलेज वाढविणें एवढाच उद्देश न ठेवतां त्याचबरोबर रेल्वेला आनुषंगिक अशा सर्व तऱ्हेच्या उद्योगधंद्यांना पूर्णपणें उत्तेजन दिलें पाहिजे, व तें शक्य तितक्या लवकर दिलें पाहिजे; तरच हिंदी रेल्वेचा कारभार आर्थिक दृष्ट्या देशहिताचा ठरेल. इंजिनें बांधणें, वॅगन्स व कोचेस बांधणें, रेल्वेच्या बांधकामासाठी पोलाद व लाकूड इ.चें उत्पादन वाढविणें, विजेचे निरनिराळ्या तऱ्हेचें साहित्य बनविणें, टेलिफोन्स इ. बनविणें, स्टेशन्स व इमारती यांच्या बांधकामासाठीं सिमेंट व लाकूड इ. उत्पन्न वाढविणें, स्क्रू, सिग्नल्स इ. रेल्वेंत लागणारें साहित्य बनविणें, या दृष्टीनें रेल्वे खात्याच्या कारभाराचा यापुढें सरकारनें विचार करावा.

रेल्वेचें अंदाजपत्रक व त्यावरील हिंदी विधिमंडळांतील चर्चा यावरून रेल्वेच्या कारभाराची प्रगति कितपत होत आहे याचा थोडा अंदाज येतो. गेल्या आठ वर्षांत उतारूंची वाढ शंभर टक्क्यांनीं झाली, परंतु गाड्यांची संख्या पांचच टक्क्यांनीं वाढली. ८,००० इंजिनांपैकीं २,००० निरुपयोगी झालीं आहेत व इंग्लंड-अमेरिकेकडेच नवीन इंजिनांसाठी पहावें लागत आहे. साध्या रेल्वेच्या कोचेसचाहि पुरवठा वर्कशॉप्समधून होऊं शकत नाहीं, व यासाठींहि परदेशांवर अवलंबून रहावें लागत आहे. फाळणीमुळें कांचपारा येथील होऊं घातलेलें वर्कशॉप सुरक्षिततेसाठी असनसोलच्या बाजूला हलविण्यांत येणार आहे. परंतु इंजिनें व कोचेसच्या बांधकामाबद्दल अद्याप निराशाजनकच परिस्थिति आहे.

तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल, ही पूर्वीपासूनच तक्रारीची महत्त्वाची बाब आहे. याहि बाबतींत लवकरच कांहीं तरी सुधारणा होईल अशी अपेक्षा करण्यांत अर्थ नाहीं, असें स्पष्टपणेंच वाहतूक मंत्र्यानीं कबूल केलें. रेल्वेच्या काराभाराच्या खर्चांत काटकसर व तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल, इत्यादि बाबतींत जी टीका केली गेली त्यामुळें वाहतूक मंत्र्यानीं सर्वसाधारण कारभारांत रु. ५० लक्षांची कपात आपण होऊन मान्य केली. ही गोष्ट टीकेचा ओघ सरकारला मान्य आहे याचें निदर्शक समजली पाहिजे.

रेल्वे कारभारांत कांहीं दोष पूर्वीच्या परंपरेनें निर्माण झाले आहेत. हे दोष दूर करणें सोपें काम नाहीं. परंतु आतां स्वातंत्र्याच्या काळांत ह्या सर्व दोषांकडे जबाबदार अधिकाऱ्यांनीं बारकाईनें लक्ष घातलें पाहिजे. बहुतेक रेल्वे राष्ट्राच्या मालकीच्या झालेल्या आहेत, व कांहीं राहिलेल्या रेल्वे मार्गांचें त्वरित राष्ट्रीयीकरण केलें जावें अशी मागणी रेल्वे-मंत्र्याकडे केली जात आहे. सुदैवानें हिंद सरकारच्या क्षेत्रांत आलेल्या रेल्वे रस्त्यांची उत्पन्न व खर्च याबाबतींत परिस्थिति पाकिस्तानच्या मानानें समाधानकारक आहे. पे कमिशनच्या शिफारसी, कोळशाची महर्गता इ. मुळें खर्च वाढतच जाणार. तरी प्रत्यक्ष कारभारांत, व्यवस्थेंत व रेल्वेला आनुषंगिक धंद्यांत लोकमताच्या अपेक्षेप्रमाणें व त्याचबरोबर हिंदच्या आर्थिक जीवनाला पोषक अशी व्यवस्था ठेवणें आवश्यक आहे.

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें या संस्थेस मुंबई प्रांतिक सरकारनें संग्रहालयास उपयुक्त असें आधुनिक शिक्षण-विषयक साहित्य खरेदी करणेसाठी म्हणून रु. १०,००० ची खास देणगी दिली आहे. हें साहित्य संग्रहालयाचे क्यूरेटर श्री. भा. वि. घारपुरे हे इंग्लंड, अमेरिका, इत्यादि देशांत प्रवास करीत असतांना खरेदी करणार आहेत.


बॉम्बे लाईफ ॲश्युरन्स कंपनी लिमिटेड

( स्थापना : १९०८ )

हेड ऑफिस : मुंबई

आलेलें विम्याचें काम

| १९४५ | १९४६ |
| --- | --- |
| ३,१४,४९,६५० रु. | ३,८७,७८,७०० रु. |

एकंदर मंजूर झालेले विमे

| १९४५ | १९४६ |
| --- | --- |
| २,७७,२३,१०० रु. | ३,२८,२१,२०० रु. |

पुणें, सोलापूर, अहमदनगर व सातारा जिल्ह्यांसाठीं इन्स्पेक्टर्स, ऑर्गनाइझर्स व एजन्टस नेमणें आहे.

मॅनेजर, पुणें ब्रँच
९२, रविवार पेठ, पुणें २

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.

| | रुपये |
| --- | --- |
| आलेलें काम : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

## पुरवठा वाढेपर्यंत नियंत्रणें कायम ठेवा

**श्री. शं. वा. किर्लोस्कर ह्यांचें मराठा चेंबरच्या षण्मासिक सभेंत अध्यक्षीय भाषण**

" गोरवाला गाडगीळ " समितीचें मत नियंत्रणें सरसकट एकदम उठवणें धोक्याचें होईल, असें आहे. पुरवठा जसजसा वाढत जाईल त्या मानानें हीं नियंत्रणें क्रमशः उठवावींत असा या समितीचा अभिप्राय आहे व तोच सर्वांना पटण्यासारखा आहे. या बाबतींत महात्माजींनीं मात्र आपला निराळा सूर काढला आहे. त्यांना असें वाटतें कीं धान्य विकणाऱ्या व्यापाऱ्यानें अल्प नफा घेऊन आपलें काम केल्यास नियंत्रणाची जरूर रहाणार नाहीं आणि तेवढ्यासाठी नियंत्रणें उठवण्याबद्दल त्यांनीं निकड लावली आहे व सरकार त्यांच्या आग्रहाला बळी पडत आहे हें अलीकडच्या उपक्रमावरून सिद्ध होत आहे. परंतु व्यापारी हाही मनुष्यच होय व मनुष्यस्वभाव हा इकडून तिकडून सारखाच. आज देशांत पुरवठ्याची टंचाई आहे हें सर्वांस माहितच आहे. तेव्हां व्यापाऱ्यांनीं कमी किंमतीस विक्री करण्याचें ठरवलें तरी एकदा गिऱ्हाइक हुल्लड करूं लागलें व मागणी प्रमाणाबाहेर वाढूं लागली तर मागणी-पुरवठ्याचे नियम अनिर्बंध चालू लागून अपुऱ्या पुरवठ्याच्या परिस्थितींत खुल्या व्यापाराचा व्हावयाचा तोच परिणाम होईल, पण त्याचें खापर मात्र व्यापाऱ्यांवर फोडलें जाईल. तेव्हां " गोरवाला गाडगीळ " समितीचा निर्णय मान्य करावा असें चेम्बरचें स्पष्ट मत आहे.

---

**साखर नियंत्रण उठविल्यामुळें गिऱ्हाइकांवर भुर्दंड !**—साखरेवरील नियंत्रण सरकारनें काढल्यामुळें चालू मोसमाच्या साखरेच्या उत्पादनासाठी गिऱ्हाइकांस कारखान्यांना सुमारें २५ कोटी रुपये जास्त द्यावे लागतील, असें मत कमॉडिटीज प्राइसेस बोर्डाचे माजी अध्यक्ष, मि. गोरवाला, ह्यांनीं व्यक्त केलें आहे. एका मोठ्या साखर कंपनीच्या शेअर्सची किंमत ३०% वाढली आहे, त्याचाहि त्यांनीं उल्लेख केला. कारखान्यांबरोबर घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांचेहि नफे वाढतील, त्यामुळें गिऱ्हाइकावर आणखी बोजा पडेल, तो वेगळाच.

**वैमानिक प्रवासाच्या दरांत वाढ**—वैमानिक दळणवळण करण्याच्या खर्चांत वाढ झाल्यामळें बऱ्याच हिंदी विमान कंपन्यांनीं आपल्या दरांत वाढ करण्याची मागणी सरकारच्या एअर ट्रॅन्सपोर्ट बोर्डाकडे केली होती. त्या मागणीचा विचार करून १५ ऑक्टोबर १९४७ रोजीं चालूं असलेल्या दरांत १ डिसेंबरपासून शेंकडा १० टक्के वाढ करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. परंतु ही वाढ दर मैलामागें ४ आण्यांपेक्षां अधिक असतां कामा नये अशी अट घालण्यांत आली आहे. ज्या मार्गावर दर आधींच ४ आणे मैल आहे, त्या मार्गावर मात्र अधिक वाढ करण्याची परवानगी नाहीं. वाढ करण्याची सक्ती मात्र नाहीं.

**सिंधमधील मोटार-वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—सिंधमधील मोटार वहातुकीचें राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय आतां पक्का झाला आहे. एकतर सध्याची वहातुक व्यवस्था कराचीच्या वाढत्या लोकसंख्येला पुरेशी नाहीं; आणि दुसरें असें कीं मोटार-वहातुक करणारे कांहीं हिंदू सिंध सोडून गेल्यामुळें वहातुकीची व्यवस्था नीट होत नाहीं. खुद्द कराचींतील ट्रॅम व बस सर्व्हिसेस युरोपिअन कंपन्यांकडून चालविण्यांत येत आहेत. ह्या कंपन्यांविषयीं अजून धोरण ठरलेलें नाहीं. १९४८ सालअखेर सिंधमधील सर्व मोटार-वहातुक राष्ट्रीय मालकीची होईल, असा अंदाज आहे.

**मुंबई प्रांतांतील सार्वजनिक सुट्या**—नवीन वर्षारंभ, १ जानेवारी; गुड-फ्रायडे, २६ मार्च व नाताळ २५ डिसेंबर ह्या सेरीज मुंबई सरकारनें १९४८ सालीं पुढील दिवशीं सार्वजनिक सुट्या जाहीर केल्या आहेत. ईद-इ-मिलाद, २४ जानेवारी; महाशिवरात्र, ९ मार्च; होळी, २५ मार्च; झरतुष्टो, १०, जून; रमझान-ईद, ७ ऑगस्ट; नारळी पौर्णिमा, १९ ऑगस्ट; गोकुळ-अष्टमी, २८ ऑगस्ट; पारशी न्यू इअर, ३ सप्टेंबर; गणेश चतुर्थी, ६ सप्टेंबर; संवत्सरी, ७ सप्टेंबर; खोरदाद साल ८ सप्टेंबर; दसरा, १२ ऑक्टोबर; बकरईद १४ ऑक्टोबर; दिवाळी, १ व २ नोव्हेंबर; मोहरम १२ नोव्हेंबर. राजाचा वाढदिवस आणि २ ऑक्टोबर ( म. गांधींचा वाढदिवस, ) ह्या सुट्या द्याव्या कीं नाहीं ह्याचा विचार चालू आहे.


**ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड**

पो. ओगलेवाडी ( सं. औंध ), जि. सातारा

कांचमाल, एनामल वेअर व प्रभाकर कंदीलाचे कारखानदार

**नवीन भांडवल वाढ**

कारखान्याच्या वाढीच्या योजना पूर्ण करण्यासाठी कंपनीने आपले पूर्वीचे दहा लक्षाचे अधिकृत भांडवलांत आणखी पंधरा लक्षांची वाढ करून एकूण अधिकृत भांडवल पंचवीस लक्ष रुपयांचे केलें आहे. मागील खेपेस विक्रीसाठीं काढलेलें २ लक्ष रुपयांचें भांडवल लगेच संपून गेल्यामुळें अनेक हितचिंतक, मित्र व सन्मान्य गृहस्थ यांना त्यांतील भाग मिळाले नाहींत, त्यामुळे त्यांचा रोष त्यावेळीं आम्हांस सहन करावा लागला. म्हणून यावेळीं दहा लक्ष रुपयांचे दोन लक्ष सामान्य भागांत विभागलेलें भांडवल विक्रीस काढलें आहे. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत पांच रुपये असून, विक्रीची किंमत ( दर्शनी किं. रु. ५ अधिक वाढ रु. २ अशी ) ७ रुपये आहे.

रकमेचा भरणा—अर्जासोबत प्रत्येक भागाबाबत रु. ४ ( भागाबाबत रु. २ अधिक वाढ रु. २ ) व बाकीचे दर भागास रु. ३ प्रमाणें कंपनीकडून मागणी आलेवर भरणा करणेचे.

तरी ज्यांना शेअर्स घेणेचे असतील त्यांनीं कंपनीकडून शेअर अर्जाचे फॉर्म्स मागवून घ्यावेत.

एस. पी. ओगले आणि कं.
मॅनेजिंग एजंटस.



**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

**१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.**

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

★ **दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी** ★


९६ नारायण पेठ, पुणें २.








पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.